सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, सिडको
यांचे कार्यालय
## शहर व औद्योगिक विकास महामंडळ, (महाराष्ट्र) मर्यादीत
बेलापुर रेल्वेस्टेशन कॉम्प्लेक्स, टॉवर नं. ०८, पाचवा मजला, सी.बी.डी बेलापूर, नवी मुंबई

जा. क्र. सहा.नि/ससं/सिडको/ ३७ /२०२६ | दिनांक:- ०६/०१/२०२६

प्रति,
श्री. शरद वाघमारे, सहकार अधिकारी श्रेणी-१
अधिन, सहनिबंधक सहकारी संस्था, सिडको,
नवी मुंबई

विषय- संस्थेच्या पुर्नविकासाबाबत आयोजित केलेल्या विशेष सर्वसाधारण सभेकरीता प्राधिकृत अधिकारी यांची नेमणुक करण्याबाबत.

संदर्भ- पंचवटी को.ऑप.हौ.सो.लि., केएल-६(ए), कंडोमिनीयम नं. २६, सेक्टर- ०१, कळंबोली, नवी मुंबई या संस्थेचे अध्यक्ष, सचिव व खजिनदार यांच्याकडील दि. २९/१२/२०२५ रोजीचे पत्र.

आपले लक्ष उपरोक्त संदर्भीय विषयाकडे वेधण्यात येत आहे.

२/- आपणास कळविण्यात येते की, पंचवटी को.ऑप.हौ.सो.लि., केएल-६(ए), कंडोमिनीयम नं. २६, सेक्टर- ०१, कळंबोली, नवी मुंबई या संस्थेचे अध्यक्ष, सचिव व खजिनदार यांनी उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये या कार्यालयात प्रस्ताव दाखल करुन महाराष्ट्र सहकारी संस्था, अधिनियम १९६० चे कलम ७९ (अ) व दि. ०४/०७/२०१९ रोजीच्या शासन निर्णयामधील मार्गदर्शक सुचनेनुसार विकासकाची निवड करण्यासाठी संस्थेने आयोजित केलेल्या विशेष सर्वसाधारण सभेकरीता प्राधिकृत अधिकारी यांची नेमणुक करावी, अशी विनंती केली आहे.

संस्थेच्या पुर्नविकासासाठी संस्थेने विशेष सर्वसाधारण सभेमध्ये कार्यालयाचे प्रतिनीधी म्हणून आपण उपस्थित राहून शासन निर्णय दिनांक ०४/०७/२०१९ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही करण्यात आली आहे अगर कसे? याबाबत अहवाल या कार्यालयास सभेच्या दिनांकांपासून आठ दिवसांचे आत सादर करावा. सदरचा अहवाल देताना संस्थेने घेतलेल्या विशेष सर्वसाधारण सभेत विकासक म्हणून नियुक्त करण्याबाबत झालेल्या कार्यवाहीचा आढावा घेवून इतिवृत्त सादर करावे.

(शंकर म. पाटील)
सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, सिडको,
नवी मुंबई

प्रत माहितीस्तव,
अध्यक्ष, सचिव व खजिनदार
पंचवटी को.ऑप.हौ.सो.लि., केएल-६(ए),
कंडोमिनीयम नं. २६, सेक्टर- ०१, कळंबोली, नवी मुंबई

सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, सिडको,
नवी मुंबई